# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.६/२०२३** **दिनांक २२/०३/२०२३**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह,शिर्डी** **वेळ- सकाळी १०.०० वा.**

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व (सिव्हील ॲप्लीकेशन नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकरीता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा बुधवार दि.२२/०३/२०२३ रोजी सकाळी १०.०० वा. संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.स्वीस/३६/२०२३, जिल्हा न्यायालय, अहमदनगर, दि.२० मार्च, २०२३ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा बुधवार दि.२२/०३/२०२३ रोजी सकाळी १०.०० वा. संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

**या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.**

**मा.श्री.सुधाकर यार्लगड्डा,**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री. सिध्दाराम सालीमठ, भा.प्र.से.**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री.राहूल जाधव,**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

---

**विषय नं.१** **सन २०२३-२४ या एक वर्षासाठी साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान व व्दारावती निवासस्थान या विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्टकंट्रोल (किटकनाशक औषध फवारणी) ई-निविदा प्रक्रिया बाबत.**

**निर्णय क्र.२०४** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा भक्तनिवासस्थान)**

---

**विषय नं.२** **आर्थिक वर्ष २०२३-२४ करीता अंतर्गत लेखापरिक्षक नियुक्तीकामी प्राप्त लेखापरिक्षण संस्थापैकी तीन लेखापरिक्षण संस्थांची नावे अंतिमत: निवडीकरीता शासनाकडे पाठविण्यास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२०५** **प्रस्तावात नमुद L-1 ते L-3 यांनी निविदेतील पात्रतेचे सर्व निकष पुर्ण केलेले असल्याने L-1 ते L-3 यांची नावे शासनाकडे पाठविण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.३** **आर्थिक वर्ष २०२२-२३ करीता वैधानिक लेखापरिक्षक नियुक्तीकामी प्राप्त लेखापरिक्षण संस्थापैकी तीन लेखापरिक्षण संस्थांची नावे अंतिमत: निवडीकरीता शासनाकडे पाठविण्यास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२०६** **प्रस्तावात नमुद L-1 ते L-3 यांनी निविदेतील पात्रतेचे सर्व निकष पुर्ण केलेले असल्याने L-1 ते L-3 यांची नावे शासनाकडे पाठविण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.४** **आर्थिक वर्ष २०२३-२४ करीता पुर्व लेखापरिक्षक (Pre-Auditor) नेमणूक करणेकामी पात्र लेखापरिक्षण संस्थांच्या फीचा तुलनात्मक तक्ता मा.तदर्थ समितीचे सभेपुढे सादर करणेबाबत.**

**निर्णय क्र.२०७** **प्रस्तावामध्ये नमुद उल्हास बोरसे ॲन्ड कं., नाशिक यांनी निविदेतील पात्रतेचे सर्व निकष पुर्ण केलेले असल्याने तसेच त्यांनी दिलेले दर निम्नतम असल्यामुळे त्यांची निवड करण्यात आली.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.५** **आयकर विषयक विवरणपत्र दाखल करणे, करनिर्धारण करणे व अनुशंगिक कामकाजाकरीता कर सल्लागार लेखापरिक्षण संस्थेची नेमणुक करणेबाबत.**

निर्णय क्र.२०८ साम अॅण्ड कंपनी, पुणे हे सन 2013-14 पासून सलग आयकर विषयक विवरणपत्र दाखल करणे, करनिर्धारण करणे व अनुषंगिक कामकाज पाहत आहेत. संस्थानची आयकर प्रकरणे त्यांना माहिती आहेत. त्यांचा पुर्वानुभव सदर प्रकरणाचा निपटारा करणेसाठी संस्थानला बहुउपयोगी आहे. सध्या आहे त्या दरात काम करण्यास ते इच्छुक आहेत किंवा नाही आणि काय दर आकारणार आहेत याचा उल्लेख प्रस्तावात न करता प्रस्ताव ठेवला होता, आता त्यांची स्विकृती ई-मेलव्दारे प्राप्त झाली आहे. ते रु. २ लाख मध्ये काम करण्यास तयार आहेत. संस्थानचे आयकर प्रकरणाची त्यांना माहिती आहे म्हणून संस्थानचे हिताचे दृष्टीकोनातुन विचार करुन सदर निविदा प्रक्रिया रद्द करण्याचा एकमताने निर्णय घेण्यात आला.

(कार्यवाही- लेखाशाखा)

---

विषय नं.६ माहे जुन-२०२२ ते ऑगस्ट-२०२२ चे जमा खर्च नोंद घेणेबाबत फेरसादर.

निर्णय क्र.२०९ तहकुब.

(कार्यवाही- लेखाशाखा)

---

विषय नं.७ माहे सप्टेंबर-२०२२ ते नोव्हेंबर-२०२२ चे जमा खर्च नोंद घेणेबाबत फेरसादर.

निर्णय क्र.२१० तहकुब.

(कार्यवाही- लेखाशाखा)

---

विषय नं.८ माहे डिसेंबर-२०२२ जमा खर्च नोंद घेणेबाबत.

निर्णय क्र.२११ तहकुब.

(कार्यवाही- लेखाशाखा)

---

विषय नं.९ आर्थिक अनुदान मागणीकरीता आलेल्या अर्जांवर निर्णय घेणेबाबत.

निर्णय क्र.२१२ आर्थिक अनुदान मागणीकरीता आलेले अर्ज नस्तीबध्द करण्यात आले.

(कार्यवाही- लेखाशाखा)

---

विषय नं.१० मौजे रुई शिवार गट नं.२९४ जमीन व्यवहारातील २० टक्के रक्कम मिळणेबाबत श्री.नितीन सुभाष भनसाळी यांचा अर्ज.

निर्णय क्र.२१३ १. सी ए दाखल करुन मा.उच्च न्यायालयाकडून प्रथमत: मंजुरी घ्यावी.

२. २० टक्के रक्कम देण्याचे अनुषंगाने संस्थानचे वकील अॅड. श्री. होन यांचा अभिप्राय घेण्यात यावा.

३. मोजणी करुन अतिक्रमण नसल्याची खात्री करावी व संपुर्ण क्षेत्राचा प्रत्यक्ष ताबा तत्कालीन मालकाकडून घ्यावा.

४. सुभाष भनसाळी व नितीन सुभाष भनसाळी या दोघांकडून उर्वरीत २० टक्के रक्कम नितीन भनसाळी यांना देण्यास ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे. असा निर्णय झाला.

(कार्यवाही-मालमत्ता विभाग/विधी विभाग)

-----------------------------------------------------------------------------------------------------------

विषय नं.११ मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांचेकडील भूसंपादन निवाडा एलएक्यु/एसआर/१०/२०००, दि.१३.०८.२०१५ अन्वयेच्या निवाडयाप्रमाणे क्षेत्र ४.७३.१९ हेक्टर (४७३१९ चौ.मी.) चा ताबा संस्थानला मिळणेबाबत. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०६.२०१९ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.३८ निर्णय क्र.२९५ रद्द करणेबाबत.

निर्णय क्र.२१४ सदर प्रकरणी अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. तहकुब. या कामी मा.न्यायालयात जमा असलेल्या रक्कमचे स्टेटस व या संदर्भात आणखी काही प्रकरणे मा.न्यायालयात प्रलंबीत आहेत काय याची माहिती द्यावी.

(कार्यवाही- मालमत्ता विभाग)

-----------------------------------------------------------------------------------------------------------

विषय नं.१२ संस्थान निधीतून नगरपंचायत हद्दीतील प्रथम प्राधान्य गटातील एकूण ११ रस्त्यांपैकी एलएक्यु/ एसआर/ ०७/२००७ या भूसंपादन प्रकरणातील जमीन मालक श्री.चांदमल झुंबरलाल लोढा यांनी कलम १८ खाली मे.राहाता न्यायालयात भूसंदर्भ क्र.३८/२०१२ दाखल केला होता, त्याचा निकाल दि.२९/०१/२०२१ रोजी पारित केला आहे. त्याच निकालाच्या आधारे कलम २८अ खाली मा.उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी तथा भूसंपादन अधिकारी यांनी केलेल्या निकालाच्या आधारे श्री.कारभारी पांडूरंग गोंदकर व इतर १ यांना वाढीव नुकसान भरपाई रक्कम अदा करणेबाबत.

निर्णय क्र.२१५ अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. तहकुब. संस्थानचे वकीलाचा अभिप्राय मागविण्यात यावा.

(कार्यवाही- मालमत्ता विभाग)

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१३** **संस्थान मालकीचे विविध ठिकाणचे जागा/गाळे शासकीय कार्यालय/खाजगी व्यक्ती/सोसायटी यांना भाडेतत्वावर दिलेल्या मिळकतीचे शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून भाडे निश्चीत करणे व तदनुषंगाने भाडे करारनामे करुन घेणेबाबत.**

**व**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५** **श्री.अभिजीत देविदास शिंदे यांना त्यांचे ऐतिहासिक वस्तु, शस्त्रास्त्रे व कलादालन व प्रदर्शन मांडण्यासाठी संस्थानचे साईप्रसादालय इमारतीतील जागेचा लिव्ह ॲन्ड लायन्सस तत्वावर वापरावयास दिलेल्या हॉल वापराचे मुदतवाढ व भाडेबाबत श्री. अभिजीत देविदास शिंदे यांचा दि.२२.०२.२०२३ रोजीचा अर्ज.**

**निर्णय क्र.२१६** **मुदत संपलेली आहे. मुदतवाढी संदर्भात ११ महिनेसाठीचे करारनामे करुन घेण्यात यावे. सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून भाडेदर निश्चीत करुन घेण्यात यावे व त्याप्रमाणे सदरचे भाडेदर करारधारकांना बंधनकारक राहील असा उल्लेख करारनाम्यामध्ये करण्यात यावा.**

**तक्ता अ मधील अ.नं. ५, ७ बाबत भाडेवाढ करणेत येऊ नये.**

**तक्ता अ मधील अ.नं. ३ व आयत्या वेळेचा विषय नं.०५ बाबत असा निर्णय घेण्यात आला की, श्री. अभिजीत शिंदे यांनी दिलेला प्रस्ताव अमान्य करण्यात आला. दि.१९.०६.२०२१ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१३ अनुसार मुदत दि.३१.०१.२०२२ संपली आहे. आता त्यांनी दि.३१.१२.२२ पर्यंत रु.१८,८५५/- दराने आणि पुढील ११ महिन्या करीता म्हणजे दि. ३०.११.२०२३ पावेतो रु.२०,७४१/- भाडे आकारणेचे मागणी केली आहे. दि.३१.१२.२२ पर्यंत सध्या आहे त्याच दराने म्हणजे रु.१,२१,०००/- प्रमाणे मुदतवाढ दिली. त्यांनी प्रस्तावीत केलेले दर अमान्य करण्यात आले. पुढील ११ महिनेसाठी त्यांना सध्याचा दर सध्याचे भाडे रु.१,२१,०००/- अधिक १० टक्के अशी एकुण रु.१,३३,१००/- मासिक भाडे मान्य असल्यास करारनामा करुन घेण्यात यावा त्यांची तयारी नसल्यास जागा खाली करुन घेण्याची कार्यवाही करण्यात यावी.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.१४** **संस्थान निधीतून शिर्डी नगरपरिषद हद्दीतील प्रथम प्राधान्य गटातील ११ रस्त्यांपैकी एलएक्यु/एसआर/०३/२००७,एलएक्यु/एसआर/०५/२००७,एलएक्यु/एसआर/०९/२००७, या भुसंपादन प्रकरणात जमीन मालकांनी भुसंपादन कायदा कलम १८ खाली कोर्टात दाखल केलेल्या भुसंदर्भ दाव्यात मा.कोर्टाचे आदेशाप्रमाणे वाढीव नुकसान भरपाईची रक्कम मुख्याधिकारी, शिर्डी नगरपरिषद, शिर्डी यांचेमार्फत मा.उप विभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांना अदा करणेबाबत.**

निर्णय क्र.२१७ मुख्याधिकारी, शिडी नगरपरिषद यांनी दि.२.२.२०२३ चे पत्रान्वये भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, शिर्डी यांनी दि.१५.५.२०२३ अखेर पर्यंत रक्कम परिगणीत करुन कळविली आहे. भुसंपादन कायदा कलम १८ प्रमाणे रक्कम देय आहे. म्हणून मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन रक्कम अदा होई पावेतो परिगणीत करुन रक्कम अदा करण्याची मंजूरी देण्यात आली.

(कार्यवाही- मालमत्ता विभाग/विधी विभाग)

---

विषय नं.१५ शिर्डी नगरपरिषद हद्दीमधील जिल्हा परिषद मोठेबाबा शाळेकरीता जागा उपलब्ध करुन देणेबाबत.

निर्णय क्र.२१८ मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा.

(कार्यवाही- मालमत्ता विभाग/विधी विभाग)

---

विषय नं.१६ मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१२४ मधील मध्यवर्ती भांडार इमारतीचे पत्रे बदलणे, रंगकाम करणे व टर्बो व्हेंटिलेटर सिस्टीम बसविणे कामाचे ठेकेदार विकास कन्स्ट्रक्शन, नवी मुंबई यांचे दुसरे व अंतिम देयकाची रक्कम रु.३५,९०,३२२/- मात्र मंजुर होऊन त्यापैकी निव्वळ देय रक्कम रु.१०,७४,२०१/-मात्र ठेकेदार यांना अदा करणेस मंजुरी देणे.

निर्णय क्र.२१९ प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही- बांधकाम विभाग)

---

विषय नं.१७ शिर्डी येथील संस्थानचे औद्योगिक प्रशिक्षण संस्था इमारतीचे पत्रे बदलणे, प्रसाधनगृह नूतनीकरण करणे, रंगकाम करणे व इतर अनुषंगीक कामे करणे कामासाठी रु.९६,८७,३५२/-या निम्नतम दराचे निविदाधारक गाडे यशवंत दिनकर, नाशिक यांचे समवेत चर्चा वाटाघाटी करुन त्यांना कार्यादेश देणेकामी निर्णय होणेबाबत.

निर्णय क्र.२२० प्रस्ताव मंजूर. मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे.

(कार्यवाही- बांधकाम विभाग/विधी विभाग)

---

विषय नं.१८ श्री साईबाबा शैक्षणिक संकुल (नवीन), औद्योगिक प्रशिक्षण संस्था व प्रसादालय या ठिकाणी एकुण ११ नग नवीन रोलींग शटर्स तयार करुन बसविणेकामी दरपत्रके बोलविणेस मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.२२१** श्री साईबाबा शैक्षणिक संकुल (नवीन), औद्योगिक प्रशिक्षण संस्था व प्रसादालय या ठिकाणी ८ नग रोलींग शटर्स बसविणे आहे, असे सभेला सांगण्यात आले. तसा बदल करुन प्रस्ताव मंजूर.

(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)

---

विषय नं.१९ संस्थानचे मंजूर आकृतीबंधातील कंत्राटी पदांवर ११ महिन्यांकरीता कंत्राटी पध्दतीने नेमणूक करण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना सेवा रजा विनियम-२०१३ नुसार रजा, सुट्टया लागू करणेबाबत.

**निर्णय क्र.२२२** चर्चेची व अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. तहकुब.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

विषय नं.२० संस्थान कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेबाबत.

**निर्णय क्र.२२३** चर्चेची व अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. तहकुब.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

विषय नं.२१ श्री साईबाबा संस्थानमधील लेखाधिकारी, अर्थ व्यवस्थापक व वरिष्ठ लेखापाल या पदांचे ग्रेड वेतनामध्ये सुधारणा करणेबाबत.

**निर्णय क्र.२२४** प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

विषय नं.२२ संस्थान आस्थापनेवरील कंत्राटी कर्मचारी यांचा दि.१.११.२०२१ ते दि.३१.०३.२०२२ या कालावधीतील कर्मचारी राज्य विमा (ESIC) रकमेचा भरणा करणेबाबत.

**निर्णय क्र.२२५** प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

विषय नं.२३ श्री साईबाबांचे पादुका दर्शन सोहळयाचे आयोजनाकामी नियमावली व समिती गठीत करणेबाबत.

**निर्णय क्र.२२६** सध्या कुठलीही आवश्यकता नाही. आवश्यकता भासल्यास समितीने सांगीतल्यास प्रस्ताव समितीपुढे सादर करावा.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

विषय नं.२४ श्री.शेखर विजयराव कुलकर्णी, सेवा निलंबीत सीसीटीव्ही ऑपरेटर, सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल यांना सेवा निलंबीत करुन विभागीय चौकशी करणेस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत व त्यांचा दि.०२.०१.२०२३ रोजीचे खातेचौकशी निष्कर्ष अहवालाबाबत.

निर्णय क्र.२२७ शिस्त पालन अधिकारी हे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत त्यामुळे त्यांनी कारणमिमांसेसह अंतिम आदेश पारित करावा व अवलोकनार्थ समितीपुढे सादर करावा.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

विषय नं.२५ श्री.राहूल रामचंद्र इंगवले, सेवा निलंबीत मदतनीस, विद्युत विभाग यांचे दि.२०.१०.२०२२ रोजीचे खाते चौकशी निष्कर्ष अहवालाबाबत.

निर्णय क्र.२२८ शिस्त पालन अधिकारी हे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत त्यामुळे त्यांनी कारणमिमांसेसह अंतिम आदेश पारित करावा व अवलोकनार्थ समितीपुढे सादर करावा.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

विषय नं.२६ श्री.भारत वेणूनाथ लावरे, मदतनीस, कॅन्टीन विभाग यांचे दि.०८.१२.२०२२ रोजीचे खाते चौकशी निष्कर्ष अहवालाबाबत.

निर्णय क्र.२२९ शिस्त पालन अधिकारी हे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत त्यामुळे त्यांनी कारणमिमांसेसह अंतिम आदेश पारित करावा व अवलोकनार्थ समितीपुढे सादर करावा.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

विषय नं.२७ श्री.राजेंद्र सोपानराव जगताप, सेवा निलंबीत प्र.प्रशासकीय अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे दि.१७.११.२०२२ रोजीचे खाते चौकशी निष्कर्ष अहवालाबाबत.

निर्णय क्र.२३० शिस्त पालन अधिकारी हे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत त्यामुळे त्यांनी कारणमिमांसेसह अंतिम आदेश पारित करावा व अवलोकनार्थ समितीपुढे सादर करावा.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

**विषय नं.२८ श्री.विनोद गोवर्धन कोते, सेवा निलंबीत प्र.सीसीटीव्ही विभाग प्रमुख, सीसीटीव्ही विभाग यांचे दि.१७.११.२०२२ रोजीचे खाते चौकशी निष्कर्ष अहवालाबाबत.**

**निर्णय क्र.२३१ शिस्त पालन अधिकारी हे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत त्यामुळे त्यांनी कारणमिमांसेसह अंतिम आदेश पारित करावा व अवलोकनार्थ समितीपुढे सादर करावा.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२९ श्री.चेतक चांगदेव साबळे, सेवा निलंबीत मदतनीस, सीसीटीव्ही कंट्रोल सेल विभाग यांचे दि.१७.११.२०२२ रोजीचे खाते चौकशी निष्कर्ष अहवालाबाबत.**

**निर्णय क्र.२३२ शिस्त पालन अधिकारी हे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत त्यामुळे त्यांनी कारणमिमांसेसह अंतिम आदेश पारित करावा व अवलोकनार्थ समितीपुढे सादर करावा.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.३० आय.टी.आय./शैक्षणिक संकुलाकडील स्वयंसेवकाचे मानधनात वाढ करणेबाबत.**

**निर्णय क्र.२३३ प्रस्ताव नामंजूर.**

**(कार्यवाही-कामगार विभाग)**

---

**विषय नं.३१ सन २०२३-२४ करीता बारा महिन्याचे कालावधीसाठी पाणी पुरवठा विभागास पाणी शुध्दीकरणासाठी आवश्यक ब्लिचींग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस सिलेंडर खरेदी करणेस व त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत.**

**निर्णय क्र.२३४ तहकुब.**

**(कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग)**

---

**विषय नं.३२ श्री साई मंदिरात हार, फुले , गुच्छ व प्रसाद सुरु करणेबाबतचे प्रस्तावावर विचार विनियम होऊन निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.२३५ अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. तहकुब.**

**(कार्यवाही-संरक्षण विभाग)**

---

**विषय नं.३३ संस्थानचे सर्व इमारतींचे फायर ऑडीटबाबत.**

**निर्णय क्र.२३६ नोंद घेतली. ऑडीटमध्ये उपस्थित झालेल्या मुद्दयांची तात्काळ पुर्तता करुन अहवाल सादर करावा.**

**(कार्यवाही-फायर अॅन्ड सेफ्टी विभाग)**

---

**विषय नं.३४ शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्त्यांच्या दैनंदिन स्वच्छता विषयक कामांचा तिमाही परिक्षण अहवाल नोंद घेणेकामी सादर.**

**निर्णय क्र.२३७ शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्त्यांच्या दैनंदिन स्वच्छता विषयक कामांचा तिमाही परिक्षण अहवालाची नोंद घेतली.**

**(कार्यवाही-आरोग्य विभाग)**

---

**विषय नं.३५ श्री साईबाबा महाविद्यालय-(Ad-hoc) सहा.प्राध्यापक, ग्रंथपाल व शारिरीक शिक्षण संचालक भरतीचे अहवालाबाबत.**

**निर्णय क्र.२३८ अहवालाचे अवलोकन करुन नोंद घेतली. एका सहाय्यक प्राध्यापकाच्या रिक्त असलेल्या जागेच्या भरती बाबत कार्यवाही करण्यात यावी.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा महाविद्यालय)**

---

**विषय नं.३६ संस्थान परिसरातील बगीचांची देखभाल व संगोपनाबाबतची कामे यांत्रिकीकरणासह आऊटसोर्स कर्मचा-यांकडून करुन घेणेबाबत.**

**निर्णय क्र.२३९ प्रस्ताव मंजूर. मा.उच्च न्यायालयात सी ए दाखल करावा.**

**(कार्यवाही-बगीचा विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.३७ वाहन विभागाकडील २० प्रवासी बसेसचे वापराबाबत.**

**निर्णय क्र.२४० सदर बसेस संस्थान कर्मचा-यांना ने-आण करणेसाठी किंवा स्कुलबस मध्ये रुपांतरीत करुन नविन शैक्षणिक संकुल येथे वापरण्यासाठी गरज अाहे का याची माहिती घेऊन पुन्हा प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही-वाहन विभाग)**

---

**विषय नं.३८ श्री साईबाबा संस्थानकडून बातम्या देण्यात काही पत्रकारांच्या बाबतीत दुजाभाव होत असलेबाबत.**

निर्णय क्र.२४१ पत्रकार व युटयुबर्सचे बाबतीत शासनाचे जे काही धोरण किंवा मार्गदर्शक तत्वे आहेत त्याचे पालन करावे.

(कार्यवाही-जनसंपर्क विभाग)

---

विषय नं.३९ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संस्थानचे शैक्षणिक संकुलात 'मराठी माध्यमासाठी प्राथमिक शाळा' सुरु करणेकरीता ऑनलाईन प्रस्ताव भरणेबाबत.

निर्णय क्र.२४२ नोंद घेतली. धोरणात्मक निर्णय असल्याने मा.उच्च न्यायालयात सी ए दाखल करावा.

(कार्यवाही-श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर/विधी विभाग)

---

विषय नं.४० शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये ज्युनिअर केजी ऑनलाईन पध्दतीने नविन प्रवेश प्रक्रिया राबविणेस व मर्यादीत एकूण २५० प्रवेश देणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.२४३ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल)

---

विषय नं.४१ सीसीटीव्ही यंत्रणा व लोकल दर्शन यंत्रणेचे मे. Escalates Tech India Pvt.Ltd. भोपाळ यांचे सादरीकरण (Presentation) करणेबाबत.

निर्णय क्र.२४४ पुढील सभेत फेर सादरीकरण (Presentation) करावे.

(कार्यवाही-सीसीटीव्ही कक्ष)

---

विषय नं.४२ सन २०२३-२४ या आर्थिक वर्षामधील संस्थानकडील दैनंदिन वापराने खराब झालेल्या निरुपयोगी भंगार साहित्यांची विक्री करणेकामी प्राप्त ई-निविदेतील उच्चत्तम दरांबाबत निर्णय होणेबाबत.

निर्णय क्र.२४५ प्रस्ताव मंजूर. समान दर प्राप्त झालेल्या निविदाधारकासमवेत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वाटाघाटी करुन उच्चतम दर देऊ करणा-या दरधारकास कार्यादेश देण्यात यावा. (कार्यवाही-अभिलेख कक्ष)

---

विषय नं.४३ सन २०२३-२४ करीता साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागाकडील बेडशीट उशी कव्हर धुणे/इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, सोलापूर चादर धुणे, चादर धुणे व गादीच्या खोळी धुणेकामी दैनिक वर्तमानपत्रात लॉन्ड्रीचे ई-निविदा जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**निर्णय क्र.२४६ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही-साई आश्रम भक्तनिवास)**

---

**विषय नं.४४ श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता दैनंदिन वापरासाठी लागणारे मशिनरी / उपकरणे/फर्निचर/इन्स्ट्रयुमेंट/इक्विपमेंट व किरकोळ साहित्य खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.२४७ माहितीची नोंद घेतली. प्रस्ताव पुन्हा सादर करावा.**
**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.४५ उत्पादीत कंपनी LG यांचे अधिकृत Service Centre मार्फत टिव्ही दुरुस्त करुन घेणेबाबत.**

**निर्णय क्र.२४८ LG यांचे अधिकृत Service Centre यांनी सहा महिन्याची वॉरंटी देण्यास तयार असल्याचे श्री.राहूल गलांडे यांनी सभेस सांगीतले. प्रस्ताव मंजूर.**
**(कार्यवाही-सीसीटीव्ही कंट्रोल सेल)**

---

**विषय नं.४६ संस्थानकडे देणगी रुपाने जमा झालेले सोने-चांदीच्या वस्तु वितळवून त्यापासून प्राप्त होणारे शुध्द सोने चांदीपासून श्री साई प्रतिमेची नाणी/पेन्डंट बनविण्यासाठी येणा-या खर्चास मान्यता मिळणेकामी दिवाणी अर्ज दाखल करणेबाबत.**

**निर्णय क्र.२४९ सोन्याचे संदर्भात दि.२२.०२.२०२३ रोजीचे भारत सरकार टंकसाळ, मुंबई यांचे पत्रात नमुद केल्याप्रमाणे प्रस्ताव मंजूर. मा.उच्च न्यायालयात सी.ए. दाखल करावा.**
**(कार्यवाही-लेखाशाखा/विधी विभाग)**

---

**विषय नं.४७ माहे जानेवारी-२०२३ जमा खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.२५० तहकुब. (कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.४८ ऑगस्ट-२०२३ सत्रासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये राज्य शासनाव्दारे ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेबाबत व प्रवेशामध्ये संस्था स्तरावरील २० टक्के जागा मध्यवर्ती प्रवेश प्रक्रियेमधुन देणेबाबत.**

**निर्णय क्र.२५१ पुर्वीप्रमाणे असल्याने प्रस्ताव मान्य करण्यात आला.**
**(कार्यवाही-श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था)**

---

**विषय नं.४९** **साई आश्रम भक्तनिवास A,B व C इमारतीचे VRV ए.सी.यंत्रणेचे कॉम्प्रेहेन्सिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी ई-निविदा बोलविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२५२** **प्रस्ताव मंजूर. मात्र मशिनचा कालावधी नमुद करावा.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.५०** **व्दारावती भक्तनिवास विभागाकडील यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग/स्वच्छता कामे सध्या कार्यरत आऊटसोर्स ठेकेदाराकडून ई-निविदा प्रक्रिया पुर्ण होई पावेतो आहे त्याच मंजूर दरात करुन घेणेकामी मुदतवाढ कार्यादेश देणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२५३** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- व्दारावती भक्तनिवास)**

---

**विषय नं.५१** **नविन दर्शनरांग प्रकल्पातंर्गत विविध काऊंटरसाठी ४५ नग संगणके व ४५ नग प्रिंटर्स प्रचलीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२५४** **अद्ययावत तंत्रज्ञानचे संगणक व प्रिंटर्स घेण्यात यावेत. जीईएम पोर्टलव्दारे खरेदीचा पर्याय वापरण्यात यावा. दोन्ही पैकी जे दर कमी येतील त्या दराने खरेदी करावी. मा.उच्च न्यायालयात सी.ए.दाखल करावा.**

**(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.५२** **सन-२०२३ करीता साईलिला मराठी व हिंदी-इंग्रजी व्दैमासिके (प्रत्येकी ०५ अंक) व साईलीला अंक वितरणकामी पाकीटे छपाई करणेसाठी निम्नत्तम दर देऊ केलेल्या निविदाधारकांना कार्यादेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.२५५** **निम्नतम दरधारकाची वाटाघाटी करुन कार्यादेश देण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले.**

**(कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

---

**विषय नं.५३** **साईगार्डन प्रकल्पातंर्गत उभारणेत येणा-या लेजर शो प्रकल्पाचे ठेकेदार मे.लेजर व्हिजन लि.हॉगकॉग यांचे समवेत आर्बिट्रेशन करणे अथवा पुन्हा प्रकल्प सुरु करणे या विषयी कायदेशीर सल्ला घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करणेसाठी सॉलिसिटर यांची नेमणूक करणेबाबत.**

**निर्णय क्र.२५६ तहकुब. (कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करण्यात आली.**
**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१ दि.१४.०३.२०२३ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.२५७ दि.१४.०३.२०२३ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**
**(कार्यवाही-सभाकामकाज विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०२ सन २०२३-२४ करीता किराणा माल, गाईचे शुध्द तुप, दुध, पॅकेंज्ड ड्रिकींग वॉटर, पेपर पिशवी व इतर अनुषंगीक साहित्य खरेदी करणेकामी खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२५८ प्रस्ताव मंजूर. मा.उच्च न्यायालयात सी.ए.दाखल करावा.**
**(कार्यवाही-भांडार विभाग/विधी विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०३ संस्थानला माहे जुलै,२०२२ ते ऑक्टोबर,२०२२ या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या गाईचे शुध्द तुप व खाद्य तेलाचे विविध प्रयोगशाळेंमार्फत करणेत आलेल्या तपासण्यांचे अहवालांबाबत.**

**निर्णय क्र.२५९ सदर पुरवठा दारास नोटीस देऊन त्याचे म्हणणे घेऊन दंडात्मक कार्यवाही तसेच काळया यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी प्रस्ताव सादर करावा.**
**(कार्यवाही-भांडार विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०४ मौजे येसगांव, ता.कोपरगाव येथील भक्तनिवास मध्ये जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षण घेणेसाठी बसण्याच्या सुविधेसाठी परवानगी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२६० कायदेशीर अडचणी आहेत. त्यामुळे अशी परवानगी देता येत नाही, असा निर्णय घेण्यात आला. (कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०५ श्री.अभिजीत देविदास शिंदे यांना त्यांचे ऐतिहासिक वस्तु, शस्त्रास्त्रे व कलादालन व प्रदर्शन मांडण्यासाठी संस्थानचे साईप्रसादालय इमारतीतील जागेचा लिव्ह ॲन्ड लायन्सस तत्वावर वापरावयास दिलेल्या हॉल वापराचे मुदतवाढ व भाडेबाबत श्री. अभिजीत देविदास शिंदे यांचा दि.२२.०२.२०२३ रोजीचा अर्ज.

निर्णय क्र.२६१ या बाबतीतील निर्णय उपरोक्त निर्णय क्र.२१६ मध्ये समाविष्ठ केलेला आहे, तो वाचावा. (कार्यवाही- मालमत्ता विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०६ श्री.मनोहर उत्तम ताकवाले, सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.

निर्णय क्र.२६२ शिस्त पालन अधिकारी हे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत त्यामुळे त्यांनी कारणमिमांसेसह अंतिम आदेश पारित करावा व अवलोकनार्थ समितीपुढे सादर करावा.

(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०७ श्री.श्रीकांत भिमराव अहिरे, मदतनीस, संरक्षण विभाग यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.

निर्णय क्र.२६३ शिस्त पालन अधिकारी हे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत त्यामुळे त्यांनी कारणमिमांसेसह अंतिम आदेश पारित करावा व अवलोकनार्थ समितीपुढे सादर करावा.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०८ श्रीमती नेहाबाई भगवान पेटारे, सेवानिलंबीत सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे दि.२७.०१.२०२३ रोजीचे खातेचौकशी निष्कर्ष अहवालाबाबत.

निर्णय क्र.२६४ शिस्त पालन अधिकारी हे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत त्यामुळे त्यांनी कारणमिमांसेसह अंतिम आदेश पारित करावा व अवलोकनार्थ समितीपुढे सादर करावा.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०९ श्री.बापुसाहेब सोनाजी वाघमारे, सेवानिलंबीत सफाई कामगार, आरोग्य विभाग यांचे दि.२७.०१.२०२३ रोजीचे खातेचौकशी निष्कर्ष अहवालाबाबत.

निर्णय क्र.२६५ शिस्त पालन अधिकारी हे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत त्यामुळे त्यांनी कारणमिमांसेसह अंतिम आदेश पारित करावा व अवलोकनार्थ समितीपुढे सादर करावा. (कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१० मंदिर परिसरात सुशोभिकरण करणेकामी विविध प्रकारचे आकर्षक फिरते (Portable) कारंजे, बसविणेस येणारे रु. ७ लक्ष मात्रचे खर्चास तसेच सदर कारंजे खरेदीसाठी दरपत्रके मागविणेस मान्यता मिळणेबाबत.

निर्णय क्र.२६६ सादरीकरण (Presentation) करावे. (कार्यवाही- बगीचा विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.११ श्री साईबाबा महाविद्यालय- (Ad-hoc) सहा.प्राध्यापक, ग्रंथपाल व शारीरिक शिक्षण संचालक यांचे मानधन वाढीबाबत.

निर्णय क्र.२६७ मानधन वाढविणेबाबत आधार दाखवुन सविस्तर प्रस्ताव ठेवावा. (कार्यवाही- श्री साईबाबा महाविद्यालय)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१२ दि.१.०४.२०२३ ते दि.३१.०३.२०२४ या कालावधीकरीता वाहन विभागाकडील १०७ वाहनांचा विमानुतनीकरण करणेबाबत.

निर्णय क्र.२६८ प्रस्ताव मंजूर. (कार्यवाही- वाहन विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१३

निर्णय क्र.२६९ साम ॲण्ड कंपनी, पुणे यांचे कडून ई-मेल प्राप्त झाला ते रु.२ लाख मध्ये काम करण्यास तयार आहेत. त्यामुळे सन २०२३-२४ पासून तीन आर्थिक वर्षासाठी आयकर विषयक विवरणपत्र दाखल करणे, करनिर्धारण करणे व अनुषंगिक कामकाज करणेस नियुक्ती करण्यात आली. (कार्यवाही- लेखाशाखा विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४**

**निर्णय क्र.२७० दर्शन रांगेत एक मोफत लाडूचा प्रसाद प्रत्येक साईभक्तांस देण्यात यावा असे आजच्या सभेत एकमताने ठरले व त्याबाबतची कार्यवाही रामनवमी पासून सुरु करणेत यावी.**

**(कार्यवाही- लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग)**

---

**वरील निर्णय क्र.२०४ ते २७० सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर दुपारी ३.०० वा. सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत/-
**(राहूल जाधव)**
**उपमुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(सिध्दाराम सालीमठ,भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(सुधाकर यार्लगड्डा)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर तथा**
**अध्यक्ष, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**